ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

# अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यातील दारिद्रयरेषेखालील आदिवासी कुटुंबातील व्यसनधिनतेचे अध्ययन

प्रा. सुर्यवंशी एस. के.,
संशोधक विद्यार्थी,
के. टी. एच. एम. कॉलेज, नाशिक.

**प्रस्तावना :**

भारतीय समाजासारखा विविधतेने नटलेला मानव समाज आजच्या जगातील फारच थोडया देशात पहावयास मिळते. धर्म, भाषा, वंश, कुळ, पंथ आणि भौतिक संस्कृती आदी बाबतीत भारतीयांची विविधता हा समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञ यांच्या अभ्यासातील विशेष आवडीचा विषय आहे. आदिवासी भागात दारिद्रयरेषेखालील कुटुंबामध्ये व्यसनधिनतेची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. पुर्वीच्या काळी आदिवासी लोक मोहाच्या फुलांपासुन तयार केलेली दारू किंवा ताडी पीत असत. अशा प्रकारची दारू ही आदिवासींच्या आरोग्याच्या दृष्टीने लाभदायक होती. पुरूषांप्रमाणे स्त्रियादेखील दारू घेत असत. परंतू अलिकडे जंगलविषयक धोरणामुळे जंगलातील वस्तूंपासून दारू काढता येत नाही. त्यावर बंदी आहे, म्हणून आदिवासी लोक आरोग्याला अहितकारक असलेली देशी दारू पितात. मद्यपान हा आदिवासी समाजाचा एक अत्यंत महत्वपुर्ण भाग असतो. आदिवासी आणि दारू, तंबाखू, विडी यांचा जवळचा संबंध आहे. सर्वच आदिवासी जमातीत दारू पिणे, तंबाखु खाणे गैर मानले जात नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या विधीमध्ये दारूला महत्वाचे स्थान असते.

शास्त्रीय संशोधन करून आदिवासी समाजातील व्यसनधिनता या समस्येचा उलगडा करून आदिवासी समुदायातील ही समस्या दुर करून त्यांना मुख्य प्रवाहात सामिल करून घेता येईल. त्याच बरोबर या समुदायाच्या सामाजिक विकासाची दिशा निश्चित करता येईल. आदिवासी समाजातील व्यसनाधिनता ही समस्या अभ्यासण्यासाठी अकोले तालुक्यातील आदिवासी समुदायातील व्यसनधिनतेचे स्वरूप त्याची तिव्रता व प्रतिकुल परिणाम या सुदायास माहिती असणे आवश्यक आहे. म्हणून या विषयावर संशोधन केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१) अकोले तालुक्यातील आदिवासी कुटुंबाच्या व्यसनाधिनतेचा अभ्यास करणे.

२) व्यसनाधिनतेच्या कारणाचा अभ्यास करणे.

३) व्यसनाधिनता कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत शोधनिबंधाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक सामग्रीचा उपयोग केला आहे. अकोले तालुक्यातील दहा गावातील ११० आदिवासी दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची अभ्यासासाठी निवड केली व १०० कुटुंबप्रमुखाकडून प्रश्नावली / मुलाखतीच्या सहाय्याने तसेच निरिक्षणाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध केली आहे.

**आदिवासी कुटुंबातील व्यसनाधिनतेचा अभ्यास :**

शोधनिबंधाचा अकोले तालुक्यातील नमुना निवड केलेल्या ११० आदिवासी कुटुंबापैकी व्यसनस्थ व दारू, तंबाखू इ. असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण व्यसनाचे परिणाम व कारणे इ. चा अभ्यास केला आहे.

**व्यसन असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण :**

सर्व्हेक्षण केलेल्या १०० आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांना व्यसन आहे याची माहिती तक्ता क्र. १ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र. १**

**व्यसन असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | व्यसन असणाऱ्या कुटुंबाची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ७३ | ८५ | ५८.८८ |
| २ | ठक्कर | २२ | २५ | ८८.०० |
| | एकुण | ९५ | ११० | ८६.३६ |

**संदर्भ** : मुलाखतीद्वारे

वरील तक्त्यावरून असे दिसते की, अभ्यासक्षेत्रातील अकोले तालुक्यातील सर्व्हेक्षित ११० आदिवासी कुटुंबामध्ये व्यसन उदा. दारू, तंबाखू इ. चे व्यसन असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण खुप जास्त आहे. ११० कुटुंबापैकी ९५ कुटुंबांना (८६.३६ टक्के) व्यसन आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, महादेव कोळी जमातीपेक्षा ठाकर जमातीत व्यसनाचे प्रमाण जास्त आहे.

आदिवासी क्षेत्रात व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे ही कुटुंबे वर्षानुवर्षे दारिद्रयरेषेखाली जिवन जगत आहेत. वंशपरंपरेने या कुटुंबातील तरूण व्यक्तीचे व्यसनाचे प्रमाण वाढत आहे. अंधश्रध्देमुळे सामुदायीक कार्यक्रमामध्ये दारूचे सेवन केले जाते. या व्यसनाधिनतेमध्ये दारूचे सेवन केले जाते. या व्यसनाधिनतेमध्ये स्त्रियांचे/पमाणही वाढत आहे. व्यसनावरील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च वाढत आहे. उपभोग खर्चाच्या १२ ते १३ टक्के खर्च व्यसनावर होताना दिसून येतो.

**व्यसनाधिनतेची कारणे :**

वरील तक्त्यावरून व्यनाचे प्रमाण ८६.३६ टक्के एवढे जास्त आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आढळून आली.

१) कर्ज घेवून कर्जाची परतफेड झाली नाही तर त्यांना मानसिक ताण येतो. त्यामुळे तो ताण दुर करण्यासाठी ते दारूचे सेवन करतात.

२) कामामध्ये चांगला उत्साह तयार होण्यासाठी दारू व तंबाखुचे व्यसन करतात, विशेषत: पावसाळयात भात रोपे लावणीच्या वेळेस दारूचे सेवन करूनच रोपे लावण्याचे काम केले जाते.

३) कौटुंबिक गरजा पुर्ण होत नाहीत त्यामुळे त्यांना मानसिक ताण, तणाव निर्माण होतो, त्यामुळे हा तणाव दुर करण्यासाठी व्यसन करतात.

४) कुटुंबातील मोठया माणसाचे अनुकरण करून यौनपिढीमध्ये व्यसनाची सवय लागते.

५) आदिवासी समाजास सण, समारंभ, लग्न व इतर कार्यक्रमाच्या वेळेस सर्वजण दारूचे सेवन करतात. त्यामुळे सवय होऊन व्यसन लागते.

६) बेकायदेशीर दारूच्या भट्टया जास्त असल्यामुळे दारू पिण्याचे प्रमाण जास्त आहे.

७) करमणुकीच्या सुविधांचा अभाव असल्यामुळे वेळ घालविण्यासाठी आदिवासी दारू व तंबाखूचे सेवन करतात.

**व्यसनाधिनता कमी करण्यासाठी उपाययोजना / शिफारशी :**

१) आदिवासी समाजात प्रत्येक जातीत कार्यक्रमात दारूचा मोठया प्रमाणात वापर केला जातो त्यावर कायदेशीर बंदी आणावी.

२) आदिवासी समाजातील मोठया माणसांनी लहान मुलांसमोर व्यसन करू नये.

३) ग्रामीण समाज, शहरी समाज आणि आदिवासी समाज यातील आर्थिक दरी कमी केली पाहिजे.

४) स्वयंसेवी संस्थामार्फत आदिवासी समाजामध्ये जनजागृती होण्यासाठी चर्चासत्रे, व्याख्याने, परिसंवाद आयोजित करावेत.

५) आदिवासी विभागामध्ये प्रत्येक गावात समाज मंदिर शासनामार्फत बांधावे व सदर समाज मंदिसात टि. व्ही व इतर करमणुकीच्या साधनाची उपलब्धता करून द्यावी.

६) आदिवासींना स्वत:ची जमीन शासनाने प्राप्त करून द्यावी त्यामुळे त्यांना स्वत:चे उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होईल.

७) व्यसनामुळे मनावर होणारे शारिरीक व्यंगाची भित्तीपत्रके प्रत्येक आदिवासी गावात लावावी.

**संदर्भ :**

१) नागतोंडे गुरूनाथ (२००३) भारतीय आदिवासी – कॉन्टीनेंन्टल प्रकाशन, पुणे.

२) प्रदीप आगलावे – "आदिवासी समाजाचे समाजशास्त्र", साईनाथ प्रकाशन नागपूर

३) आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थान पुणे, सप्टेंबर २०११, पृष्ठ क्र. ४४,५०

४) अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण – अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन (२००७–०८)